महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड

(पुणे मेट्रो रेल प्रकल्प)

**महा मेट्रोने घेतला सुरक्षेचा आढावा**

**नाशिक फाट्याची घटना वैयक्तिक चुकीमुळे व अपवादात्मक**

पुणे,१० : महा मेट्रो नाशिक फाट्याच्या अपघाताची प्रकल्प संचालक व मुख्य प्रकल्प व्यवस्थापक यांच्या समीतीने चौकशी पूर्ण केली असून संपूर्ण सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेण्यात आला आहे. अशी घटना पुन्हा घडू नये म्हणून सर्व सबंधितांना सूचना देण्यात आल्या असून नवीन “स्टॅंडर्ड ऑपरेटिंग प्रोसीजर” निर्धारित करण्यात आल्या आहेत. अशी घटना पुन्हा घडू नये म्हणून अनेक उपाययोजना अंमलात आणल्या आहेत . संबंधीत पायलिंग रिंग चालकाला कामावरून काढून टाकले असून कंत्राटदाराला ताकीद व दंड ठोठवण्यात आला आहे.

महा मेट्रोच्या पुणे मेट्रो रेल प्रकल्पात सुरक्षा निर्धारण करण्यासाठी त्रिस्तरीय सुरक्षा व्यवस्था असून ती २४ X ७ कार्यरत असते. कंत्राटदार कडील सुरक्षा व्यवस्था,मेट्रो सल्लागार यांची सुरक्षा व्यवस्था व खुद्द मेट्रोची सुरक्षा व्यवस्था या तिन्ही व्यवस्था सतत कामांचा सुरक्षा आढावा घेत असतात. सुरक्षा चमू आकस्मित निरीक्षण करत असून वेळोवेळी कंत्राटदाराला सूचना देत असतात व महा मेट्रोच्या २५०० कामगारांना सुरक्षेसाठी कसोशीने प्रयत्न करीत असतात. पुणे मेट्रो एका त्रयस्थ निष्णात संस्थेकडून सुरक्षा व गुणवत्तेचे ऑडीट करण्यासाठी पाचारण करणार आहे. या अपघातामुळे पुणे मेट्रोने नवीन सुरक्षा प्रणाली “स्टॅंडर्ड ऑपरेटिंग प्रोसीजर” अमलात आणली आहे जेणेकरून वैयक्तिक स्वरूपाच्या चुकांमुळे घडणारे अपघात रोकण्यात येतील.

महा मेट्रोच्या पुणे मेट्रो रेल प्रकल्पांतर्गत वेगेवेगळ्या १३६ यंत्रांचा वापर करण्यात येत असून नाशिक फाट्याचा अपघात पायलिंग यंत्र चालकाच्या वैयक्तिक चुकी मुळे घडला असून अपवादात्मक आहे. दोन वर्षापासून पुणे मेट्रोचे काम वेगवेगळ्या विभागात सुरु आहे परंतु मेट्रोच्या सक्षम सुरक्षा व्यवस्थेमुळे आतापर्यंत अशी घटना घडली नाही. नाशिक फाट्याची

घटना अपवादात्मक असून पुणे मेट्रोने या घटनेची पूर्ण चौकशी करून संबंधितांना सुचना दिल्या आहेत. ठेकेदारांना नोटीस पाठविला असून दंड ठोकावला आहे. पिंपरी चिंचवड ते स्वारगेट आणि वनाज ते रामवाडी असा मेट्रो रेल्वेचा मार्ग साकारला जात आहे. ११ हजार ४२० कोटी खर्च होणाऱ्या ३१.२५४ कि.मी.च्या या मार्गावर मेट्रो धावणार आहे. प्रकल्पाचे काम सध्या वेगात सुरु असून अनेक अत्याधुनिक मशिन या कामासाठी वापरल्या जात आहेत.अत्याधुनिक मशिनीच्या वापरामुळे मेट्रोच्या कामात गुणवत्ता नियंत्रणात मदत होत आहे. मेट्रो रेल्वे प्रकल्पाचे काम काम बघणे हा इंजिनीयरिंगच्या विध्यार्थ्यासह सर्वसामान्य नागरिकांसाठीही औत्सुक्याचा विषय ठरत आहे.

पुणे मेट्रो रेल प्रकल्पात आतापर्यंत १००० पेक्षा अधिक पायलिंगचे काम पूर्ण झाली आहेत. पीसीएमसी ते बोपोडी या भागात एकूण ६३० पाईलिंगची कामे करावयाची होती त्यापैकी ५८३ पायलिंगची कामे तसेच वनाज ते सिव्हील कोर्ट या भागात एकूण ६३८ पाईलिंगची कामे करावयाची होती त्यापैकी ४१० पायलिंगची कामे आतापर्यंत पूर्ण झाली आहे.  साधारणता: ९० टव्के पाईल्सची कामे पीसीएमसी ते बोपोडी या विभागात पूर्ण झाली असून नाशिक फाट्याच्या अपघाता व्यतिरिक्त एकही अपघात गेल्या दोन वर्षात या विभागात झालेला नाही. हा संपूर्ण प्रकल्प मुदतीत साकारण्यासाठी मनुष्य बळाबरोबर अत्याधुनिक मशिनीही महत्वाच्या भूमिका बजावत आहेत. पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्प साकारण्यासाठी ११ पायलिंग रिंग, ७ लॉचिंग गर्डर, २४ हायड्रा मशिन, ८ रोड क्रेन,२६ एक्सवेटर व पोकलेन मशिन, ४९ डम्पर ट्रेलर, ११ गँट्री क्रेन इत्यादी प्रकारची एकूण १३६ यंत्रे कार्यरत आहे. या यंत्रांची वेळोवेळी देखभाल करण्यात येते जेणे करून कुठल्याही प्रकारचा अपघात घडू नये. यंत्रचालकांचे परवाना व वैद्यकीय तपासण्या पण नियमित करण्यात येत आहे. नाशिक फाट्याच्या अपघातामुळे मेट्रोला बऱ्याच नवीन गोष्टींचे ज्ञान झाले असून अश्या प्रकारच्या घटना भविष्यात घडू नये म्हणून मेट्रोने कंबर कसली आहे.